

# सामाजिक बदल घडवणारे आसमंत फाउंडेशन

**रत्नागिरीतील आसमंत बेनोव्हलन्स फाउंडेशन ही संस्था गेली सहा वर्षे भविष्यातील नवी पिढी सक्षम व्हावी म्हणून मुलांचा सर्वांगिण विकास, भारतीय संगीताचा प्रसार आणि पर्यावरण रक्षणासाठी निसर्गाचे संगोपन या तीन क्षेत्रांमध्ये काम करत आहे. प्रसिद्धीपासून दूर असलेले या संस्थेचे संस्थापक नंदकुमार पटवर्धन यांची तळमळ पाहता त्यांच्या उपक्रमांना सामाजिक पाठबळ मिळावे, या हेतूने आसमंतच्या वाटचालीबद्दल लिहित आहे. संगीत, मुले आणि निसर्ग या विधात्याच्या अतिशय सुंदर देणग्या आहेत. त्यांचे संगोपन, संवर्धन व वृद्धी ही समाजाच्या हातात आहे. या तिन्हींचे संरक्षण करण्यासाठी आणि समृद्धीसाठी आसमंत कटिबद्ध आहे. चांगल्या गोष्टी समाजापर्यंत पोहोचवणाऱ्या आसमंतच्या उपक्रमांची ही ओळख..**

संगीताने एकाग्रता, आनंद या गोष्टींबरोबरच आत्मशुद्धीही होते. यामुळे भारतीय शास्त्रीय संगीत लोकप्रिय करणे आणि त्याचे जतन करणे व श्रवणशक्तीचा विकास हा आसमंतचा मुख्य हेतू आहे. सामान्यांपर्यंत शास्त्रीय संगीत पोहोचवण्यासाठी रत्नागिरी, राजापूर येथे सुप्रसिद्ध गायकांच्या मैफलीचे आयोजन संस्था दरवर्षी करते. २०१० पासून हा उपक्रम सुरू असून ग्रामीण भागातील रसिकांना शास्त्रीय संगीत ऐकता यावे व या क्षेत्रातील दिग्गज कलाकारांशी संवाद साधता यावा, हा यामागील हेतू आहे. आजवर पं. उदय भवाळकर, पं. कौशिकी चक्रवर्ती, पं. रोणू मुजुमदार, पं. राजन-साजन मिश्रा, पं. अजय चक्रवर्ती, उस्ताद राशिद खान, राहुल शर्मा यांच्या संगीत मैफली झाल्या आहेत. राजापुरातील धूतपापेश्वर मंदिरात उदय भवाळकर यांचा भगवान शंकराची सांगितिक पूजा बांधणारा शिवरंजनी कार्यक्रम संस्थेने आयोजित केला होता. यात उत्तर भारतीय संगीतातील अगदी कमी लोकांना माहिती असलेले ध्रुपद ऐकवून त्यांनी गर्दी केलेल्या राजापूरवासीयांची दाद मिळवली. जागतिक किर्तीचे बासरीवादक पं. रोणू मुजुमदार यांची चारशेहून अधिक रसिक श्रोत्यांसमोर झालेली राजापुरातील मैफल संस्मरणीय ठरली. त्याचप्रमाणे संस्था उदयोन्मुख गायकांना व्यासपीठ देऊन त्यांचा यथोचित सत्कार करते आणि भारतीय शास्त्रीय संगीताचा अभ्यास करणाऱ्यांना शिष्यवृत्ती देते.

आजची मुले उद्याचे सुजाण नागरिक असल्याने गरिबीमुळे पाहिजे त्या क्षेत्रात जी मुले शिक्षण घेऊ शकत नाहीत अशा मुलांचा शैक्षणिक भार आसमंत संस्था दरवर्षी उचलत आहे. मुलांमध्ये सकारात्मक भावना वाढीस लावून त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी कार्यशाळा, स्पर्धा व जाणिवा विकसित करण्याचे कार्यक्रम संस्थेतर्फे केले जातात. दरवर्षी २५ गरीब मुलांची निवड करून त्यांना संस्था गणवेश देते. सन २०१५ पासून रत्नागिरीमधील निरीक्षणगृह व बालगृहातील विद्यार्थ्यांच्या रोजच्या दूध व न्याहारीचा आर्थिक भार संस्था उचलत आहे.

२०१३ पासून रत्नागिरी व राजापूरमध्ये वर्षातून दोन वेळा आठवड्याभराचे संस्कार शिबिर संस्था आयोजित करते. यात मुलांना बौद्धिक, शारीरिक व मानसिक विकासास उपयुक्त गोष्टी शिकवल्या जातात. यामध्ये योगा, नकाशा वाचन, पर्यावरणाबद्दल जाणिवा वाढविणे, प्लास्टिकच्या अतिवापरास आळा, मैदानी व पारंपरिक खेळांचे शास्त्रशुद्ध ज्ञान, व्यक्तिमत्त्व विकास व अभ्यासदौरे यांचा समावेश असतो.

संस्थेतर्फे मुलांसाठी घेतली जाणारी पर्यावरणस्नेही गणपती (इकोफ्रेंडली गणेशमूर्ती) ही स्पर्धा संस्थेची वेगळी ओळख बनली आहे. गेली पाच वर्षे स्पर्धा घेतली जात असून दरवर्षी रत्नागिरीत १०० विद्यार्थी सहभागी होतात. या स्पर्धेला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन आता राजापूरमध्येही स्पर्धा घेतली जाते. निसर्गाची ओळख व्हावी आणि त्याच्या संवर्धनात मुलांचा सहभाग वाढावा यासाठी संस्थेने पक्षीमित्र किरण पुरंदरे यांच्या दोन कार्यशाळा घेतल्या आहेत. ठाणे जिल्ह्यातील जूचंद्र-वसई येथील प्रसिद्ध रांगोळीकार मीनार पाटील यांची दोन दिवसांची रांगोळी कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी संस्थेने रत्नागिरीत घेतली होती. शिक्षणापासून वंचित मुलांना आसमंत साह्य करत असते. अत्यंत गरीब व शारीरिक व्यंग किंवा दुर्बलता असलेल्या मुलांची शैक्षणिक फी, शालेय साहित्य आणि पोषण आहार देण्यात संस्थेचा नेहमीच पुढाकार असतो.

वाढत्या शहरीकरणामुळे सर्वत्र आरसीसी घरे व बिल्डिंग उभ्या राहत आहेत. किनारे, पाणथळ जागा यांच्यावर भराव टाकला जातोय. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे हवा व पाण्याचे प्रदूषण होत आहे. यातच लोकांची अनास्था आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यामुळे निसर्गसंवर्धनासाठी कोणीतरी पुढाकार घेण्याची गरज असल्याने आसमंत संस्था विविध उपक्रमाद्वारे लोकांची मानसिकता बदलून या कार्यात आपला खारीचा वाटा उचलत आहे. याची सुरवात म्हणून आसमंतने 'वनस्पती उद्यान' हा प्रकल्प हाती घेतला आहे. त्याकरिता रत्नागिरीतील औद्योगिक वसाहतीत सहा एकर जागा संस्थेने पाच वर्षांच्या कराराने भाड्याने घेतली आहे. त्यामध्ये सध्या औषधी गुणधर्म असलेल्या पंचवीस जातींच्या १२५ देशी वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन केले जात आहे. वृक्षांची निवड करत असताना औषधी गुणधर्मांसोबतच पर्यावरणातील त्या वृक्षाचे स्थान याचाही विचार केला आहे. येथे विविध किटक, पक्षी यावेत, त्यांचा अधिवास वाढावा व यातून निसर्गाचा समतोल राखण्यास हातभार लागावा हा हेतू आहे. लवकरच येथे सीडबँक सुरू करण्याचा विचार असून भविष्यात निसर्गप्रेमी व अभ्यासकांसाठी हे वनस्पती उद्यान खुले केले जाईल.

संस्था, नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागृती निर्माण करणारे कार्यक्रम राबवत असते. विद्यार्थी व लोकसहभागाने पारंपरिक जलस्रोत, झरे व नद्या स्वच्छ करून जलसंवर्धन करणे, किनारपट्टीला खारफुटीची लागवड आदी उपक्रम हाती घेण्याचा संस्थेचा मानस आहे.

## आसमंतला क्षितिज विस्तारायचे आहे...

✻ रत्नागिरी जिल्ह्यात आसमंत कार्यरत आहे. ✻ दारिद्र्य वा गरिबीमुळे एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नयेत. ✻ सुधारगृह, बालगृहातील मुलांची उत्तम वाढ होण्यासाठी प्रयत्न. ✻ मुलांमधील कौशल्यांचा विकास होईल अशा कार्यशाळांचे आयोजन. ✻ प्रत्येक मुलामध्ये पर्यावरणाबाबत जागृती निर्माण करणे ✻ मोठ्या प्रमाणावर खारफुटी लावण्याचा कार्यक्रम हाती घेऊन किनारपट्टीचे रक्षण करणे. ✻ पाणथळ जमिनीचा छोट्यात छोटा तुकडाही वनस्पती उद्यान व्हावा व तेथे पक्ष्यांचा अधिवास निर्माण व्हावा. किमान असा परिसर संवर्धन केंद्र म्हणून तयार होऊन तेथे नैसर्गिकरीत्या वाढणाऱ्या प्रजाती मुक्तपणे वाढाव्यात यासाठी प्रयत्न. ✻ धोक्यात आलेल्या देशी वनस्पतींच्या प्रजाती वाढवण्यासाठी सीडबँक निर्मिती

## तुमचा सहभाग मोलाचा....

✻ आसमंतच्या शिबिरे, चळवळी व उपक्रमामध्ये तुम्ही कार्यकर्ता म्हणून सहभागी होऊ शकता. ✻ सढळहस्ते देणगी देऊन आर्थिक हातभार लावू शकता. ✻ विविध कंपन्या त्यांच्या सीएसआर ॲक्टिव्हिटीसाठी आमच्या संस्थेसोबत संयुक्त कार्यक्रम घेऊ शकतात किंवा सीएसआर फंडाद्वारे संस्थेचे उपक्रम वा कार्यक्रम पुरस्कृत करू शकतात. ✻ पाणलोट क्षेत्रात वनस्पती उद्यान, पक्षी उद्यान निर्मितीसाठी मदत करू शकता.

**संपर्कासाठी पत्ता : आसमंत बेनोव्हलन्स फाउंडेशन**
पीएम 75, एमआयडीसी, मिरजोळे, रत्नागिरी
415639, महाराष्ट्र, भारत.
संपर्क- **912352228673, 228516, 09970056523.**
**इमेल**– info@aasamant.org,
**URL**- http://www.aasamant.org/

आसमंत बेनोव्हलन्स फाउंडेशनच्या या चळवळीमध्ये सुधीर गाडगीळ, डॉ. प्रशांत पटवर्धन, शिल्पाताई पटवर्धन, किरण पुरंदरे आदी संस्थेचे सल्लागार वेळोवेळी मार्गदर्शन करतात. तसेच आसमंतच्या कार्यालयातील सर्व मंडळी आपुलकीने कोणत्याही मानधनाची अपेक्षा न ठेवता मदत करतात.

**– मकरंद पटवर्धन, रत्नागिरी**